# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,

विभागीय कार्यालय, डॉ. पारगावकर हॉस्पिटलच्या समोर, समर्थनगर छत्रपती संभाजीनगर
दुरध्वनी क्र.०२४०-२२४२१५८ ईमेल -dpoawb@gmail.com

आ.क्र. राप/विनिछसं/आरया/शि.ऊ./२५/१०८६२
विभाग नियंत्रक यांचे कार्यालय,
रा.प छत्रपती संभाजीनगर दि.१२/१२/२०२५

प्रति,
माननिय,

- जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.
- सहा- संचालक जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, छत्रपती संभाजीनगर
- मा सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (ता). मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगीक सुचना केंद्र, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर
- प्रकल्प अधिकारी, अदिवासी विकास प्रकल्प कार्यालय छत्रपती संभाजीनगर

विषय :- सत्र २०२५- २०२६ या सत्राकरिता एक वर्षासाठी शिकाऊ उमेदवारांची ऑनलाईन प्रक्रीयेव्दारे प्रशिक्षणार्थीची व्दितिय भरती करणे बाबत.

संदर्भ :- १) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.११/२०१७ पत्र क्र. राप/कर्मवर्ग/आरया/युआर/१५७७ दि.२२.०३.२०१७.
२) क.खा.परीपत्रक क्र.३४/२०२३ क्र.राप/कर्मवर्ग/आरया/घसं/७०७० दि.०८.१२.२०२३.

महोदय,

शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९६१ नुसार या विभागात २०२५- २०२६ या सत्रासाठी कार्यशाळेकरीता तांत्रीक व्यवसायातील शिकाऊ उमेदवाराची एक वर्ष मुदती करीता व्दितिय भरती करावयाची आहे. त्या साठी आवश्यक असणारी शैक्षणीक पात्रता, भरावयाच्या जागा वयोमर्यादा प्रशिक्षण कालावधी इत्यादी बाबींचा खालील प्रमाणे उल्लेख करण्यात आलेला आहे.

| अ क्र | व्यवसाय नाव | भरावयाची जागांची संख्या | किमान शैक्षणीक अर्हता | वयोमर्यादा दि.०१.०१.२०२६ रोजी पुर्ण करणे आवश्यक राहील. | २१/२०२४ / ५६६० दि.०९.०९.२०२४ नुसार विदयावेतन | प्रशिक्षण कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मेकॅनिक मोटार व्हेईकल | ४५ | सरकारमान्य औद्योगीक प्रशिक्षण संस्थेतील मेकॅनिक मोटार व्हेईकल ट्रेड दोन वर्षाचा (I.T.I.) व एस.एस.सी. (इ.१० वी) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे | १४ ते ३८ वर्ष (मागास वर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथीलक्षम) | रु.११९३३/- (दरमहा) | एक वर्ष |

Bharti Mej File No-2

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | इलेक्ट्रीशियन | ३० | सरकारमान्य औद्योगीक प्रशिक्षण संस्थेतील इलेक्ट्रीशियन ट्रेड दोन वर्षाचा (I.T.I.) व एस.एस.सी.(इ.१० वी) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | १४ ते ३८ वर्ष (मागास वर्गीयासाठी ०५ वर्ष शिथीलक्षम ) | रु.११९३३/- (दरमहा) | एक वर्ष |
| ३ | शिट मेटल वर्कर | ०९ | सरकारमान्य औद्योगीक प्रशिक्षण संस्थेतील शिट मेटल वर्कर ट्रेड एक वर्षाचा (I.T.I.) व एस.एस.सी (इ.१० वी) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | १४ ते ३८ वर्ष (मागास वर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथीलक्षम ) | रु.१८९१६/- (दरमहा) | एक वर्ष |
| ४ | मॅकेनिक (डिझेल) | ३७ | सरकारमान्य औद्योगीक प्रशिक्षण संस्थेतील मॅकेनिक (डिझेल) ट्रेड एक वर्षाचा (I.T.I.) व एस.एस.सी.(इ.१० वी) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | १४ ते ३८ वर्ष (मागास वर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथीलक्षम ) | रु.१८९१६/- (दरमहा) | एक वर्ष |
| ५ | वेल्डर | ३० | सरकारमान्य औद्योगीक प्रशिक्षण संस्थेतील वेल्डर ट्रेड एक वर्षाचा (I.T.I.) व एस.एस.सी. (इ.१० वी) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | १४ ते ३८ वर्ष (मागास वर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथीलक्षम ) | रु.१८९१६/- (दरमहा) | एक वर्ष |
| ६ | मेकॅनिक मेकॅट्रोनिक्स | ०६ | सरकारमान्य औद्योगीक प्रशिक्षण संस्थेतील मेकॅनिक मेकॅट्रोनिक्स ट्रेड दोन वर्षाचा (I.T.I.) व एस.एस.सी. (इ.१० वी) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे | १४ ते ३८ वर्ष (मागास वर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथीलक्षम ) | रु.११९३३/- (दरमहा) | एक वर्ष |
| ७ | रेफ्रीजरेशन + ओअर कंडीशनीग | ०८ | सरकारमान्य औद्योगीक प्रशिक्षण संस्थेतील रेफ्रीजरेशन + अेअर कंडीशनीग ट्रेड दोन वर्षाचा (I.T.I.) व एस.एस.सी. (इ.१० वी) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | १४ ते ३८ वर्ष (मागास वर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथीलक्षम ) | रु.११९३३/- | एक वर्ष |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | पेन्टर | ०३ | सरकारमान्य औद्योगीक प्रशिक्षण संस्थेतील पेन्टर ट्रेड दोन वर्षाचा (I.T.I.) व एस.एस.सी. (इ.१० वी) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | १४ ते ३८ वर्ष (मागास वर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथीलक्षम) | रु.११९३३/- | एक वर्ष |
| ९ | टर्नर | १० | सरकारमान्य औद्योगीक प्रशिक्षण संस्थेतील टर्नर ट्रेड दोन वर्षाचा (I.T.I.) व एस एस सी. (इ.१० वी) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे | १४ ते ३८ वर्ष (मागास वर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथीलक्षम) | रु.११९३३/- | एक वर्ष |
| १० | इन्स्टुमेन्ट मेकॅनिक (यांत्रिकी उपकरण) | ०८ | सरकारमान्य औद्योगीक प्रशिक्षण संस्थेतील इन्स्टुमेन्ट मेकॅनिक (यांत्रिकी उपकरण) ट्रेड दोन वर्षाचा (I T I. ) व एस.एस.सी. (इ.१० वी) उत्तीर्ण असणे आवश्यक 25- 20 | १४ ते ३८ वर्ष (मागास वर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथीलक्षम) | रु.११९३३/- (दरमहा) | एक वर्ष |

शिकाऊ उमेदवार निवडीकरिता संगणकीय प्रणाली सुरु झाल्याने शिकाऊ उमेदवारी सत्र २०२५-२०२६ करीता उपरोक्त आय टी आय व्यवसाय उत्तीर्ण झालेल्या विदयार्थ्यांनी शिकाऊ उमेदवारीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी Skill India पोर्टल वरील www.apprenticeshipindia.org या वेबसाईटवर M S R T C DIV CONTROLLER chhatrapati sambhajinagar या आस्थापनेकरीता ऑनलाईन रजिस्ट्रेशन (अर्ज / अप्लाय) करतील, व M S R T C DIV CONTROLLER chhatrapati sambhaji nagar या आस्थापनेकरीता ऑनलाईन अप्लाय करावे. तसेच नोंदनी क्रमांक मिळालेल्या उमेदवारांकडुनच अर्ज मागविण्यात येतील व त्याच उमेदवारांना शिकाऊ उमेदवारी करता येईल. उमेदवारांनी ऑनलाईन रजिस्ट्रेशन केल्यानंतर त्यांनी या कार्यालयास दि. १६.१२.२०२५ ते ०१.०१.२०२६ पर्यंत (रविवार व सुटटीचे दिवस वगळुन, शनीवारी १३:०० वाजे पर्यंत) सकाळी ११:०० ते १५:०० वेळेत विभागीय कार्यालय, म.रा.मा.प. महामंडळ, समर्थ नगर, छत्रपती संभाजीनगर येथे रजिस्ट्रेशनची छायांकीत प्रत व खालील कागदपत्रे सादर करावी. अर्ज स्वीकारण्याची अंतीम तारीख ०१.०१.२०२६ रोजी वेळ १५.०० पर्यंत राहील. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोद घ्यावी. अर्जदाराने अर्जासोबत शिकाऊ उमेदवारी करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी खुला प्रवर्गा करिता रु.५००-रु.९० (१८%GST) = रु.५९०/- (पाचशे नव्वद फक्त) व मागासवर्गीय प्रवर्गा करिता रु २५०-रु.४५ (१८%GST) = रु.२९५/- (दोनशे पंच्यानव फक्त) या प्रमाणे राहील व त्यावरील बॅकेचे शुल्क सेवाशुल्कासही उमेदवाराने सदर रकमेचा डिमांड ड्राफ्ट (डी.डी.) M.S.R.T.C.FUND ACCOUNT या नावाने राष्ट्रीय बॅकेच्या D.D. (डिमांड ड्राफ्ट) अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे. डिमांड ड्राफ्टच्या मागे उमेदवारांनी त्यांचे संपुर्ण नाव व पत्ता, मोबाईल क्रमांक आणि ट्रेडचे नाव ठळक अक्षरात लिहीने अत्यंत आवश्यक आहे. उमेदवाराने भरलेले प्रक्रीया शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही.

०१ ऑनलाईन रजीस्ट्रेशन केलेला फॉर्म (Apploy केल्याची प्रत)
०२ शाळा सोडल्याचा दाखल (टी.सी.).
०३ एस.एस.सी (१० वी ) उत्तीर्ण गुणपत्रक व इतर शैक्षणिक पात्रतेचा दाखला.
०४ आय टी आय उत्तीर्ण गुणपत्रक सर्व सेमीस्टर, व प्रमाणपत्र बंद पाकीटात स्वतंत्र जोडणे आवश्यक
०५ जातीचे प्रमाणपत्र
०६ आधारकार्ड छायाकीत प्रत
०७ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व खुला प्रवर्गाचे उमेदवार वगळून इतर मागासवर्गातील उमेदवाराने नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र जोडणे आवश्यक.
०८ अलीकडे काढलेला स्वतःचा पासपोर्ट साईज फोटो

- प्रशिक्षण सुरु होण्यापुर्वी जिल्हाशल्य चिकीत्सक, छत्रपती संभाजनगर याचे कडुन वैद्यकीय तपासणी करून घेण्यात येईल त्यात पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच शिकाऊ उमेदवारी करीता बोलविण्यात येईल.
- उमेदवाराने I.T.I.व्यवसाय उत्तीर्ण झाले पासुन ०३ वर्षाच्या आत शिकाऊ उमेदवारी करणे बंधनकारक आहे. ०३ वर्षा पुढिल शिकाऊ उमेदवाराचे अर्ज स्विकारले जाणार नाही. तसेच शिकाऊ उमेदवार १९६१ नुसार उमेदवाराने यापुर्वी सरकारी अथवा खाजगी कंपनीत / संस्थेत एकदा शिकाऊ उमेदवारी कायद्यानुसार शिकाऊ उमेदवारी केली असल्यास ते शिकाऊ उमेदवारी करिता पात्र होऊ शकत नाही याची उमेदवारांनी नोद घ्यावी.
- प्रशिक्षण कालावधी पुर्ण झाल्यानंतर उमेदवारांना म.रा.मा.प.महामंडळाच्या सेवेत सामावुन घेण्यात येणार नाही. तसेच रा.प.सेवेत सामावुन घेण्या बाबत कोणताही हक्क राहणार नाही, याची संबधित उमेदवारांनी नोद घ्यावी.

सही/-
श्री.प्रमोद संभाजी नेहुल
विभाग नियंत्रक
रा.प.छत्रपती संभाजीनगर

प्रत - महाव्यवस्थापक (क.व औ.स.) रा.प. मध्यवर्ती कार्यालय मुंबई- ०८
प्रत - प्रादेशिक व्यवस्थापक नियंत्रण समीती क्र.०२ रा.प.छत्रपती संभाजीनगर प्रदेश याना माहितीस्तव सादर.
प्रत - यंत्र अभियंता (चा) / उप यंत्र अभियंता / वि.वा.अ./ वि.क.व.अ./ वि.ले.अ./ वि.वा.अ.(अ.प.)/ वि.भां.अ./ व.सु.व.द.अ./विधी.अ./ का.अ./ वि.अभियंता (स्था)/ वि.अभियंता (वि)/.वि.सांख्यीकी अ./ रा.प. छत्रपती संभाजीनगर याचे माहिती पुढील कार्यवाहीस्तव.
प्रत - आगार व्यवस्थापक रा.प. छत्रपती संभाजीनगर क्र.०१/ छत्रपती संभाजीनगर क्र.०२/ पैठण/ सिल्लोड/ कन्नड/ वैजापुर / गंगापुर/ सोयगाव आपले आगारात काम करित असलेल्या सर्व कर्मचाऱ्याना सदर जाहिरात निदर्शनास आणावे तसेच माहितीसाठी प्रत आगाराच्या सुचना फलकावरती प्रसिध्द करण्यात यावी. तसेच एक प्रत आपल्या तालुक्यातील आय.टी.आय. कार्यालयास प्रसिध्दीसाठी जमा करण्यात यावी. व तसे केल्याचे या कार्यालयास कळविण्यात यावे.

श्री प्रमोद संभाजी नेहुल
विभाग नियंत्रक
रा.प.छत्रपती संभाजीनगर